**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेचा समारोप
## महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संघ विजेता
## कुलगुरूंच्या हस्ते सत्कार

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात सुरु असलेल्या महाराष्ट्र राज्यस्तरीय आंतर विद्यापीठ कुलगुरू चषक टी-२० स्पर्धेचा समारोपीय कार्यक्रम डॉ.के.जी. देशमुख सभागृहात नुकताच संपन्न झाला. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, प. व मू. मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. अविनाश असनारे, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, महासचिव श्री विलास सातपुते, उपाध्यक्ष श्री संजय ढाकूलकर, श्री निलेश वंदे उपस्थित होते.

स्पर्धेत प्रथम विजेता संघ महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, उपविजेता संघ महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर, तृतीय क्रमांकासाठी मुंबई विद्यापीठ, मुंबई संघाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी चषक, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देवून, तर सामन्यात चतुर्थ क्रमांक मिळविल्याबद्दल डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला चमूला प्रमाणपत्र देवून गौरन्वित करुन त्यांच्या उत्कृष्ट खेळाबद्दल त्यांचे कौतुक केले. सामन्यात उत्तम पंच म्हणून निर्विवाद कार्य केल्याबद्दल आशिष सोळंके, कपील गिरी, अतुल तिडके, कपिल कारिया, नागराज रावळे यांचा, अनिकेत पिंपळकर यांचा स्कोअरर म्हणून, मैदानाची उत्कृष्ट निर्मिती केल्याबद्दल विनोद खांडे यांचा, तर खेळाडूंची उत्तम भोजनाची व्यवस्था केल्याबद्दल प्रियंका कॅटररर्सचे संचालक प्रफुल्ल कोरमकर यांचा कुलगुरूंचे हस्ते स्मृतिचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर म्हणाले, उत्कृष्ट आयोजनाची विद्यापीठाची परंपरा सातत्याने सुरू असून याही स्पर्धेचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल त्यांनी सर्वांचे कौतुक केले.

प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. विठ्ठलसिंग परिहार यांचे पुढील वर्षी कुलगुरू चषक क्रिकेट टी-२० स्पर्धेच्या यजमानपदाची जबाबदारी स्वीकारल्याबद्दल कौतुक करुन कुलगुरू चषक क्रिकेट टी-२० स्पर्धेचे उत्तम आयोजन केल्याबद्दल प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर यांनी शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देवून क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. अविनाश असनारे यांचा सत्कार केला. प्रास्ताविकतेतून कर्मचारी संघाध्यक्ष श्री अजय देशमुख यांनी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेच्या आयोजनामागील भूमिका विषद करुन सहभागी सर्व चमूंचे आभार मानलेत. कर्मचारी संघाचे महासचिव श्री विलास सातपुते यांनी स्पर्धेचा अहवाल वाचून दाखविला. कार्यक्रमाचे संचालन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. अविनाश असनारे यांनी, तर आभार कर्मचारी संघाचे उपाध्यक्ष श्री संजय ढाकूलकर यांनी मानले.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. १४/०१/२०१९.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी